दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..

● वर्ष १६ वे ● अंक १७७ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● बुधवार दि.२२ सप्टेंबर २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

दैनिक रायगड नगरी
जाहिरातीचे उत्तम माध्यम
या वृत्तपत्रात व्यावसायिक, शैक्षणिक जाहिराती तसेच वारस दाखला, नावात बदल, मिळकत खरेदी-विक्री, सहकारी संस्था, तसेच बक्षिसपत्र बाबतच्या नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क करा.
Publish Your Public Notice, Tender Notice,
Property, Missing Documents, Change of Name ads. in 'Dainik Raigad Nagari'
For Booking....
Call / Whatsapp : 9619737911 / 9619979706
Off : 12, Radha Hari Niwas Complex, Opp.old Ratan talkies, Tilak Road, Panvel. Ph : 022-27469434
Web : www.raigadnagari.com / Email : raigad.nagari@gmail.com

# ठाकरे-अमित शहा यांची दिल्लीत होणार भेट ; तर्कवितर्कांना उधाण

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्यात शिवसेना आणि भाजपमध्ये अनेक कारणांनी तणाव निर्माण झालेला असताना दिल्लीत येत्या रविवारी ( २६ सप्टेंबर ) मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि देशाचे गृहमंत्री अमित शहा एका बैठकीत एकत्र येणार आहेत. मुख्यमंत्री ठाकरे यांनी या बैठकीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांशी चर्चा केली आहे.

नक्षलवादी कारवाया, नक्षलग्रस्त भागांचा विकास, शहरी नक्षलवाद या मुद्द्यांवर गृहमंत्री अमित शहा यांनी ही बैठक बोलावली आहे. नक्षल प्रभावित राज्यांचे प्रतिनिधी या बैठकीला उपस्थित राहणार असून महाराष्ट्रातून मुख्यमंत्री उद्धव ठाकरे हे या बैठकीला हजेरी लावणार आहेत. त्यामुळे या बैठकीकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे. या बैठकीनंतर अमित शहा आणि उद्धव ठाकरे यांच्यात स्वतंत्रपणे चर्चा होणार का?, याबाबतही उत्सुकता ताणली गेली आहे. राज्यातील सध्याची राजकीय स्थिती पाहता अनेक अर्थांनी उद्धव ठाकरे यांची ही दिल्लीवारी चर्चेत आहे.



राज्यांमधील नक्षलवादाशी मुकाबला करण्यासाठी केंद्राचे जे राष्ट्रीय धोरण आहे व कृती आराखडा निश्चित करण्यात आलेला आहे, त्यावर बैठकीत चर्चा होणार आहे. २०१५ मध्ये केंद्राने याबाबत धोरण निश्चित केले असून त्यात सुरक्षा उपाययोजना, विकासाला चालना आणि स्थानिकांच्या हक्कांचे रक्षण हे मुद्दे केंद्रस्थानी ठेवण्यात आले आहेत. या बैठकीसाठी दिल्लीला रवाना होण्यापूर्वी मुख्यमंत्री ठाकरे यांनी सोमवारी पहिली आढावा बैठक घेतली. राज्याचे गृहमंत्री दिलीप वळसे पाटील, मुख्य सचिव सीताराम कुटे आणि वरिष्ठ पोलीस अधिकारी बैठकीला उपस्थित होते. नक्षलवादी कारवाया रोखण्यासाठी राज्य सरकार करत असलेले प्रयत्न, नक्षलग्रस्त भागात सुरू असलेली विकासाची कामे, दळणवळण आणि वाहतुकीचे जाळे विस्तारणारे प्रकल्प, निधीची तरतूद, निधी खर्च न झाल्यास त्याची कारणे, वनांचा प्रश्न, केंद्र-राज्य समन्वय या मुद्द्यांवर या बैठकीत चर्चा झाली. मुख्यमंत्र्यांनी याबाबत गुरुवारी पुन्हा एकदा बैठक बैलावली असून त्यात दिल्लीतील बैठकीत मांडायचे मुद्दे निश्चित करण्यात येणार आहेत, असे सूत्रांनी सांगितले.

## संक्षिप्त...

### भरधाव ट्रेलरच्या धडकेत मोटार सायकलस्वाराचा मृत्यू

**दै.रायगड नगरी । जीवन केणी**

**उरण** : उरण तालुक्यातील खोपटा - नवघर रस्त्यावर खोपटा पुलाजवळ भरधाव जाणाऱ्या ट्रेलरने जोरदार धडक दिल्याने काल मंगळवारी (२१) सकाळी झालेल्या अपघातात मोटारसायकल स्वार संदिप पाटील या तरुणाचा जागीच मृत्यू झाला आहे. उरण तालुक्यात जेएनपीटी बंदराच्या माध्यमातून कंटेनर यार्डचे जाळे मोठ्या प्रमाणात निर्माण झाले आहे.

त्यामुळे या कंटेनर यार्डमधून बंदराकडे ये - जा करणाऱ्या मालवाहू अवजड वाहनांची वर्दळ मोठ्या प्रमाणात वाढली आहे. मोठ्या संख्येने रात्री अपरात्री सुरु असलेल्या अशा भरधाव धावणाऱ्या अवजड वाहनांवर नियंत्रण कोणाचेच नसल्याने होणाऱ्या अपघातांमुळे अनेक निष्पापांना आपले प्राण गमवावे लागले आहे.

काल सकाळी ठिक ८:१५ च्या सुमारास वशेणी गावातील रहिवाशी असणारा तरुण कामगार संदिप पाटील हा तरुण सीबर्ड या खाजगी प्रकल्पात सेक्युटरी म्हणून कामावर होता.

मोटारसायकल वरुन नेहमी प्रमाणे द्रोणागिरी नोड परिसरातील जात असतांना खोपटा पुला जवळ भरधाव वेगात येणाऱ्या मालवाहू अवजड ट्रेलरने धडक दिली. या अपघाताताच मृत्युमुखी पडला. या अपघाताची माहिती मिळताच उरण पोलिस घटना स्थळी दाखल झाले.

यावेळी परिसरातील नागरिकांनी, कामगारांनी मोठ्या प्रमाणात गर्दी करुन भरधाव वेगात जाणाऱ्या ट्रेलरवर निर्बंध घालण्यात यावेत तसेच मृत संदिप पाटील यांच्या कुटुंबीयांना न्याय मिळावा अशी मागणी केली.

# राज्य सरकार सेवाभावी संस्थांना पाठबळ देत ग्रामीण भागातील विकासासाठी कटिबद्ध : ना.सुभाष देसाई

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

ग्रामीण भागातील अशिक्षित अकुशल तरुणांना पहल ही संस्था ओळख देण्याचे कार्य करीत असून, अशा संस्थांची ठिकठिकाणी कार्यालये व्हायला हवीत. ग्रामीण भागातील तरुणांच्या हाताला काम मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या अशा संस्थांना उत्तेजन देऊन ग्रामीण भागाच्या विकासासाठी झटायला हवे,यासाठी राज्य सरकारही कटिबध्द आहे, असे प्रतिपादन उद्योग मंत्री सुभाष देसाई यांनी आज खालापूर येथे केले.



खालापूर येथील स्कील ट्रेनिंग सेंटर च्या उद्घाटन कार्यक्रमाच्या वेळी ते बोलत होते. यावेळी आमदार महेंद्र थोरवे, सभापती श्रीमती पाटील, खालापूर मुख्याधिकारी श्रीमती राठोड, माथेरानच्या मुख्याधिकारी श्रीमती सुरेखा भणगे, तहसिलदार आयुब तांबोळी, पहल स्किल डेव्हलपमेंट संस्थेचे पदाधिकारी, उद्योजक भरत भाई शहा व अन्य मान्यवर उपस्थित होते.

गावकऱ्यांनी दिवसातले काही तास त्या गावातल्या मुलांना ट्रेनिंग व कौशल्य देण्यासाठी या केंद्राचा वापर करायला द्यावा. स्वतंत्र विकास केंद्र आपल्या गावात तयार होण्यासाठी शाळा दिवसा वर्ग घेतात परंतु संध्याकाळी आपल्याला अशा प्रकारचे अभ्यास वर्ग शाळांमध्ये घेता यावेत, याची सांगड घातली गेली पाहिजे. कौशल्य, माहिती, ज्ञान, संपादन करून स्वतःच्या पायावर उभे राहतील एवढी सक्षम होतील आणि आपल्याबरोबर अनेकांना बरोबर घेऊन त्यांनाही मोठं करतील याची मला खात्री आहे आणि म्हणून अशा धडपडणाऱ्या मुलांच्या मागे मजबूत करणारी संस्था या मुलांना ओळख मिळवून देण्याचे पहल संस्थेने काम हातात घेतले त्यांना प्रोत्साहन दिले पाहिजे. अशा प्रकारच्या वाटचालीचा

.../२

# सदनिका न देता केली दोन लाख १३ हजार रुपयांची फसवणूक, गुन्हा दाखल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

चिंचवली येथे सदनिका न देता दोन लाख १३ हजार पाचशे रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. बांधकाम व्यवसायिक यशवंत झेंडे यांच्या विरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

यशस्वीनगर, ठाणे येथील रोहन विनोद शिंदे हे पनवेल परिसरात नवीन घर विकत घेण्यासाठी शोधत होते. यावेळी सुमेध इंटरप्राईजेसचे संकल्प बिल्डर अँड डेव्हलपर्सचे होर्डिंग त्यांना दिसले. त्या वरील नंबर वर फोन केला असता त्यांन चिंचवली येथील साईट विजिट साठी बोलावून घेण्यात आले. चिंचवली येथे गेल्यानंतर प्लॉटवर नियोजित प्रकल्प चालू करणार असल्याचे सांगितले. यावेळी २७५ चौरस फुटाच्या सदनिकेसाठी ३ लाख ३० हजार रुपये सांगण्यात आले. त्यामुळे रोहन शिंदे यांनी दोन लाख ५३ हजार पाचशे रुपये चेकद्वारे दिले. त्यानंतर सदनिकेच्या बांधकामा बाबत विचारणा केली असता काम चालू असल्याचे सांगण्यात आले. साइटवर जाऊन चौकशी केली असता काही रूमचे काम करून बिल्डरने त्या रूम भाडे तत्त्वावर दिले असल्याचे तेथील

.../२

# मृतदेहाचे तुकडे करून टाकल्याप्रकरणी मृत व्यक्तीच्या पत्नीचाही सहभाग उघड

**दै.रायगड नगरी । नवीमुंबई**

उसन्या पैशावरून नातेवाईकाची हत्या करून मृतदेहाचे तुकडे करून टाकल्याप्रकरणी एपीएमसी पोलिसांनी मयत व्यक्तीच्या पत्नीला देखील अटक केली आहे. घटनेवेळी मारेकरूकडून हत्येचा कट रचला जात असताना त्याच्या इशाऱ्यावरून पत्नी मुलांना घेऊन घराबाहेर गेली होती. तर मृतदेहाची विल्हेवाट लावल्यानंतर ती घरी आली असता दोन दिवसांनी पती बेपत्ता झाल्याची तक्रार केलेली.

एपीएमसी आवारात आढळलेल्या मृतदेहाच्या तुकड्यांवरून पोलिसांनी एकाला अटक केली आहे. उसने घेतलेल्या पैशाची मागणी करूनही मिळत नसल्याने त्याने हत्या करून तीन ठिकाणी तुकडे टाकल्याची कबुली दिली आहे. मात्र पोलीसांच्या सखोल तपासात या घटनेला अधिक वेगळे वळण मिळाले आहे.

मयत व्यक्ती रवींद्र रमेश मंडोटिया (३०) याच्या हत्येची कल्पना त्याच्या पत्नीला होती, व तिच्या संमती नंतरच मारेकरूने रवींद्र याची त्याच्याच घरात हत्या केली. यामुळे पतीच्या हत्येच्या गुन्ह्यात सहभागी असल्याने एपीएमसी पोलिसांनी तिला देखील अटक केली आहे. अटक आरोपी सुमितकुमार चौहान हा सतत रवींद्र याच्या घरी असायचा.

घटनेच्या दिवशी सुमितकुमार हा रवींद्रच्या हत्येचा कट रचून त्याच्या घरी गेला होता. यावेळी सुमितकुमारच्या इशाऱ्यावरून रवींद्रची पत्नी मुलांना घेऊन घराबाहेर गेली होती. त्यानंतर सुमितकुमार याने रवींद्रला दारू पाजल्यानंतर तो मद्यधुंद अवस्थेत असताना हत्या केली. यानंतर त्याच ठिकाणी त्याच्या मृतदेहाचे तुकडे केल्यानंतर घर स्वच्छ केले. तर रात्रीच्या वेळी मृतदेहाचे तिन्ही तुकडे घराबाहेर नेऊन वेगवेगळ्या ठिकाणी टाकले. या संपूर्ण घटनेची कल्पना त्याच्या पत्नीला असतानाही तिने मौन बाळगले. शिवाय दोन दिवसांनी पती बेपत्ता झाल्याची तक्रार कोपर खैरणे पोलिसांकडे केली होती. मात्र सुमितकुमार याच्या अटकेनंतर त्याच्याकडून घटनाक्रम समजून घेत असताना पोलीसांना मृत रवींद्रच्या पत्नीवर देखील संशय आला. त्यानुसार शुक्रवारी तिला देखील अटक करण्यात आली आहे.

### वडाळे तलाव येथे महिला व नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीकोनातून ...

# पोलीस व सुरक्षा रक्षकांकरिता उंचीवर असलेली केबिन बांधावी : प्रितम म्हात्रे

**दै.रायगड नगरी । पनवेल**

वडाळे तलाव येथे महिला व नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीकोनातून पोलीस/सुरक्षा रक्षकांकरिता उंचीवर असलेली केबिन बांधण्याकरिता प्रस्ताव तयार करण्याची मागणी पनवेल महापालिकेचे विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यानी केली आहे.



विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यानी सोमवारी वडाळे तलाव परिसराची पाहणी केली. वडाळे तलाव परिसरात रात्रीच्या वेली तलावात घाण व निर्माल्य टाकत आहेत. या ठिकानी कोणताही अनुचित प्रकार घडण्यापासून थांबवण्यास पोलीस व सुरक्षा रक्षकांना उंचीवर असलेल्या केबिनची मदत होईल. या पाहणी दरम्यान नगरसेविका डॉ.सुरेखा मोहोकर, प्रीती जॉर्ज, माजी नगर-सेवक डी.पी म्हात्रे, जॉनी जॉर्ज, पालिकेचे उप शहर अभियंता संजय कटेकर, विद्युत विभाग प्रमुख प्रितम पाटील, श्री.कदम, महावितरणचे अधिकारी उपस्थित होते.

### कोविड योद्धे आणि गणवेशधारी कर्मचारी विशेष गृहनिर्माण योजनेतील

# अर्जदारांना अनामत रक्कम भरण्याकरिता सिडकोच्या एम्पॅनल्ड बँकाकडून आवश्यकतेनुसार मिळू शकणार कर्ज

**दै.रायगड नगरी । नवीमुंबई**

सिडको महामंडळाच्या कोविड योद्धे आणि गणवेशधारी कर्मचारी गृहनिर्माण योजनेतील अर्जदारांना अनामत रकमेचा भरणा करण्याकरिता आवश्यकतेनुसार सिडकोच्या एम्पॅनल्ड बँकांकडून कर्ज मिळू शकणार आहे. हा निर्णय गृहनिर्माण योजनेकरिता अर्ज करणाऱ्या कोविड योद्ध्यांसाठी निश्चितच फायदेशीर ठरणार आहे.

सिडकोकडून १५ ऑगस्ट २०२१ रोजी कोविड योद्धे आणि गणवेषधारी कर्मचारी विशेष गृहनिर्माण योजनेचा प्रारंभ करण्यात आला असून या योजने अंतर्गत नवी मुंबईच्या तळोजा, कळंबोली, खारघर, घणसोली आणि द्रोणागिरी या ५ नोडमध्ये एकूण ४,४८८ घरे (सदनिका) उपलब्ध करून देण्यात आली आहेत. एकूण ४,४८८ घरांपैकी १०८८ घरे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकासाठी तर उर्वरित ३४०० घरे ही

> अर्जदारांना अनामत रक्कमेची जमवाजमव सुलभतेने करता यावी यासाठी सिडकोने हे सकारात्मक पाऊल उचलले आहे. अर्जदारांनी आपल्या आवश्यकतेनुसार या सुविधेचा लाभ घ्यावा व आपल्या घराचे स्वप्न साकार करावे.
>
> **डॉ. संजय मुखर्जी, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको**

सर्वसाधारण प्रवर्गाकरिता आहेत.

आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकारिता रु. २ लाख आणि सर्वसाधारण प्रवर्गाकरिता रु. २.५ लाख अनामत रक्कम लागू आहे. कागदपत्रे जमा करण्यासाठी व अनामत रक्कम भरण्याकरिता ०९ सप्टेंबर २०२१ ही अंतिम तारीख असताना अर्जदारांनी केलेल्या विनंतीवरून यापूर्वीच ०७ ऑक्टोबर २०२१ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

.../२

# बनावट प्रमाणपत्राद्वारे नोकरी मिळविणाऱ्या युवकावर गुन्हा दाखल

**दै.रायगड नगरी । उरण**

बनावट क्रिमिनल प्रमाणपत्र बनवून पुणे महानगरपालिकेच्या आरोग्य विभागात नोकरी मिळविलेल्या उरणच्या करंजा येथिल तरूणाचा प्रताप अखेर उघड झाला असून प्रमाण पत्र पडताळणी करताना हा प्रकार उघड झाला आहे. प्रितेश पद्माकर पाटील (३०) असे या तरूणाचे नाव आहे. त्याच्यावर उरण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिस सूत्रांकडून मिळालेल्या वृत्तानुसार प्रितेश पद्माकर पाटील या तरूणाला त्याच्या गुणवत्तेवर आणि कागदपत्रांच्या आधारावर पुणे महानगरपालिकेत आरोग्य सेवेत परिवहन विभागात गट क या पदावर नियुक्ती करण्यात आली होती. नियुक्ती नंतर त्यांचे प्रमाणपत्र कोकण आयुक्तांकडे तपासणीसाठी आले होते. तेथून ते अलिबाग आणि शेवटी उरण तहसिल कार्यालयात तपासणीसाठी आले होते. प्रितेश पाटील याचे नान क्रिमिलेअर प्रमाणपत्र तपासले असता त्यावरील बारकोड स्कॅन केल्यानंतर या दाखल्यावरच्या तारखेमध्ये फेरफार केल्याचे निष्पन्न झाले.

तसेच नॉन क्रिमिलेअर दाखल्यावर डिजिटल सही, उपविभागिय अधिकारी, यांचे नाव तारीख यांचा गोल शिक्का असतो. मात्र या दाखल्यावर तो नव्हता.

.../२

# रायगड जिल्हा अपर पोलीस अधिक्षकपदी अतुल झेंडे



**दै.रायगड नगरी । अलिबाग**

महाराष्ट्र राज्य शासनाचे बदलीने पदस्थापन करण्याचे आदेश झाल्याने त्यानुसार नवनियुक्त अपर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे यांनी अपर पोलीस अधीक्षक सचिन गुंजाळ यांचेकडून रायगड जिल्हा अपर पोलीस अधीक्षक पदाचा पदभार स्वीकारला आहे.

अपर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे यांनी यापूर्वी सोलापूर ग्रामीण, बुलढाणा, रायगड, नाशिक, मुंबई इत्यादी ठिकाणी यशस्वीरीत्या काम पाहिले आहे. रायगड जिल्हा अपर पोलीस अधीक्षक पदाची सूत्रे हातात घेतल्यानंतर नुकताच उत्कृष्ट कामगिरीकरीता रायगड जिल्हा पोलीस दलास राज्यातील बेस्ट पोलीस युनिट अवार्ड मिळालेला असून यापुढे देखील अशीच उल्लेखनीय कामगिरी पोलीस अधीक्षक रायगड यांच्या मार्गदर्शनाखाली करणार असल्याचे सांगून समाजातील सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहचून काम करण्याचा प्रयत्न करणार असले बाबत त्यांनी म्हटले आहे.

# जखमी 'कॅप्टन'

'मी म्हणजेच पंजाब आणि मी म्हणजेच पक्ष' या कॅप्टन अमरिंदरसिंग यांच्या दुराग्रही वृत्तीला टाचणी लावण्याचे काम काँग्रेसने केले. कर्तृत्वसंपन्न व्यक्तीने एककल्ली वागणे सोडले नाही तर काय होऊ शकते, हा धडा कॅप्टन त्यांनी घेतला असेल. त्यांना हात लावणे, हे काँग्रेसचे अलीकडचे सर्वाधिक धाडसी पाऊल आहे. वरिष्ठ नेत्यांचा तीव्र विरोध आणि वारंवार अपयशाचा सामना केल्यानंतरही, कायमस्वरूपी नेतृत्वाबाबत खंबीर निर्णय घेण्याच्या स्थितीत सध्या काँग्रेस दिसत नाही. पंजाबबाबत मात्र पक्षाची कृती, केंद्रीय नेतृत्व मूग गिळून राहणारे नाही, हे सिद्ध करणारी आहे. पंजाब हे काँग्रेसच्या ताब्यातील महत्त्वाचे राज्य आहे. निवडणुकांच्या तोंडावर तिथे बदल करण्यात धोका होता. पक्षाने तो पत्करला. चरणजितसिंह चन्नी हे पंजाबचे सोळावे मुख्यमंत्री झाले. या निमित्ताने राज्याला पहिला दलित चेहरा मिळाला. सोबत उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतलेले सुखविंदर रंधावा आणि ओ. पी. सोनी यांच्या नियुक्तीमागे राजकीय संतुलन आहे. अमरिंदरसिंग यांचे हे दोघेही कट्टर विरोधक. नवज्योतसिंग सिद्धूंकडे धुरा न देऊन केंद्रीय नेतृत्वाने सावध; पण तेवढाच चतुराईचा पवित्रा घेतला. अर्थात, मोदी लाटेत पंजाब एकहाती राखणाऱ्या अमरिंदरसिंग यांना डिवचून, समस्याही वाढवून घेतल्या आहेत. गांधी कुटुंबाला महत्त्व न देण्याच्या डावपेचांमुळे कॅप्टन अडचणीत आले होते. अकाली दल आणि भारतीय जनता पक्षाविषयीच्या त्यांच्या मवाळ धोरणाने नेहमीच संशयात भर घातली. राहुल गांधी यांचा जालियनवाला बाग स्मृतिस्थळाच्या नूतनीकरणाला विरोध असताना, अमरिंदरसिंग यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या सोयीची भूमिका घेतली. पक्षाच्या केंद्रीय नेत्यांना दिलेले आव्हान महागात पडू शकते, याची तमा बाळगली नाही. पक्ष संघटनेकडे त्यांचे दुर्लक्ष होत असल्याच्या तक्रारी वाढल्या होत्या. प्रभारी बनून हरीश रावत यांचा पंजाबमध्ये झालेला प्रवेश, ही अमरिंदरसिंग यांच्या गच्छंतीची नांदी होती. त्यांनी मुख्यमंत्र्यांच्या विरोधातील मोहरा म्हणून सिद्धू यांचा पुरेपूर वापर करून घेतला. सिद्धूंनी कॅप्टनपुढे समस्या निर्माण केल्या. अमरिंदरसिंग यांनी सिद्धूंचे खाते बदलून वचपा काढला. नाराज सिद्धूंनी राज्यातील व्यसनाधीनता आणि वीजबिलांवरून अमरिंदर यांना लक्ष्य करणे सुरू ठेवले. अकाली दलाशी सरकारी भागीदारी सुरू असल्याचा आरोप सिद्धू करीत राहिले. सिद्धूंना पंजाबचे प्रदेशाध्यक्षपद देऊन, पक्षश्रेष्ठांनी मुख्यमंत्र्यांवर नेम धरला. या डावपेचांनी कॅप्टन कमालीचे नाराज झाले. पायउतार झाल्यानंतरही सिद्धूंकडे धुरा जाऊ नये, यासाठी त्यांनी सर्वतोपरी प्रयत्न केले. पाकिस्तानी पंतप्रधानांचे मित्र असलेल्या सिद्धूंना त्या देशाचे एजंट ठरविले. सीमेवरील राज्य असल्याने, राष्ट्रीय सुरक्षेच्या नावाखाली अमरिंदरसिंग सातत्याने पंतप्रधान आणि गृहमंत्री अमित शहा यांना भेटत राहिले. या जवळिकीमुळेही त्यांना पक्षातून काटशह मिळत गेले. अमरिंदरसिंग यांच्या गच्छंतीमागे देशातील अन्य राज्यांच्या नेतृत्वबदलांचीही पार्श्वभूमी आहे. मागील आठवड्यात भाजपने गुजरातेत रुपानींचा राजीनामा घेत अवघे मंत्रिमंडळ बदलले. भूपेंद्र पटेल या अनपेक्षित चेहऱ्याकडे सत्तासूत्रे सोपविली. त्यापूर्वी उत्तराखंडमध्येही तीरथसिंह रावत यांना डच्चू देऊन पुष्करसिंह धामींकडे नेतेपद देण्याची आणि शक्तीशाली येडियुरप्पांना घालवून बसवराज बोम्मईंकडे कर्नाटकची सूत्रे भाजपने दिली. निवडणूकपूर्व चाचण्यांनी पंजाबात भाजपच्या खात्यात भोपळा दाखविला आहे. शेतकरी आंदोलनाची धग जिवंत ठेवण्याचे महत्त्वाचे काम पंजाबने केले. अशा पार्श्वभूमीवर पंजाबचा कॅप्टन बदलणे सोपी गोष्टी नव्हती. आता काँग्रेसमधील रस्सीखेच संपली, असेही नाही. नव्या मुख्यमंत्र्यांनी शपथ घेताच पक्षातील वादांचे टणात्कार कानी पडू लागले. 'पुढील निवडणुका नवज्योतसिंग सिद्धूंच्या नेतृत्वात लढल्या जातील' या रावत यांच्या वक्तव्याने नवी आग लावली आहे. मुख्यमंत्रिपदाचा हिंदू चेहरा बनून शर्यतीत असलेले सुनील जाखड यांनी इच्छेला तूर्त मुरड घातली आहे; मात्र भविष्यातील संधींवर पाणी सोडलेले नाही. रावत यांच्या वक्तव्याने नव्या मुख्यमंत्र्यांचे बळ कमी केले, अशी टीका त्यांनी लगेच केली. अमरिंदरसिंग हे जखमी वाघ आहेत. ते अकालींना साथ देतात, की पंजाबातील भक्कम राजकीय प्रवेशासाठी आसुसलेल्या भाजपच्या वळचणीला जातात, हे कळेलच. शेतकरी कायद्यांना असणारा विरोध त्यांच्या राजकीय भूमिकांवर मर्यादा आणेल. या तंट्यात आम आदमी पक्षाला लाभ होऊ शकतो. काँग्रेसचा भावी 'सरदार' रोखणे, हेच कॅप्टनचे आता सर्वोच्च प्राधान्य असेल. आक्रमक सिद्धूंना सांभाळण्याचे काँग्रेसपुढचे आव्हानही सोपे नाही.

# चिरनेर जंगल सत्याग्रहातील हुतात्मा दिनावर यंदाही कोरोनाचे सावट



**दै.रायगड नगरी । उरण**

देशाच्या स्वातंत्र्यासाठी उरण तालुक्यातील चिरनेर येथे २५ सप्टेंबर १९३० रोजी आक्कादेवीच्या माळरानावर झालेल्या गौरवशाली व शौर्यशाली लढ्यात आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या शूरवीर हुतात्म्यांच्या स्मूतीदिन कार्यक्रमावर मागील वर्षीप्रमाणे यंदाही कोरोनाचे सावट असून,हा कार्यक्रम अतिशय सध्या पद्धतीने साजरा करण्यात येणार असल्याची माहिती चिरनेर ग्रामपंचायतीचे सरपंच संतोष चिर्लेकर यांनी दिली आहे.

या रणसंग्रामात धाकू गवत्या फोफेकर, नाग्या महादू कातकरी दोघेही - चिरनेर, आलू बेमट्या म्हात्रे - दिघोडे, आनंदा माया पाटील –धाकटी जुई, रामा बामा कोळी–मोठी जुई, मोरेश्वर रघुनाथ शिंदे (न्हावी)–कोप्रोली, परशुराम रामा पाटील–पाणदिवे व हसुराम बुद्धाजी घरत–खोपटे या आठ शूरविरांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी जुलमी ब्रिटिश सत्ते विरोधात आक्कादेवीच्या माळरानावर जंगल सत्याग्रह केला.

दरवर्षी चिरनेर येथे रायगड जिल्हा परिषदेच्या माध्यमातून आणि चिरनेर ग्रामपंचायतीच्या वतीने हुतात्म्यांच्या नातेवाईकांचा व स्वातंत्र्य सैनिक आणि जखमींच्या नातेवाईकांचा यथोचित सत्कार व्यासपीठावरील मान्यवरांच्या हस्ते करण्यात येतो. मात्र यंदाही कोरोनाचा प्रादुर्भाव कमी प्रमाणात असला तरी शासनाच्या निर्बंधांचे पालन करीत अधिक गर्दी न करता हुतात्मा स्तंभ आणि शिलालेख यांनी पुष्पचक्र आणि पुष्पहार अर्पण करून पोलिसांची शासकीय सलामी अशा अवघ्या काही अवधीत हा कार्यक्रम कोणत्याही प्रकारे गाजावाजा न करता थोडक्यात आटोपण्यात येणार असल्याची माहिती चिरनेर ग्रामपंचायतीचे सरपंच संतोष चिर्लेकर यांनी दिली आहे.

# खारघर परिसरातील शेकडो जणांनी केला शिवसेनेत जाहीर प्रवेश



**दै.रायगड नगरी । पनवेल**


शिवसेना पक्षप्रमुख तथा महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री उद्धव बाळासाहेब ठाकरे व युवासेना प्रमुख तथा राज्याचे पर्यावरण व पर्यटन मंत्री आदित्य ठाकरे यांच्या कार्यप्रणाली वर प्रेरित होऊन, शिवसेना जिल्हाप्रमुख रायगड शिरीष घरत यांच्या नेतृत्वाखाली तसेच पनवेल महानगर समन्वयक गुरुनाथ पाटील यांच्या प्रयत्नाने खारघर शहर सेक्टर–२१ येथील संदीप गोसावी यांच्या सह शेकडो पुरुषांनी शिवसेना पक्षात जाहीर पक्ष प्रवेश केला.

या वेळी जिल्हाप्रमुख शिरीष घरत यांनी सर्वांच्या हाती शिवबंधन बांधून पक्षात स्वागत केले. त्या प्रसंगी विधानसभा समन्वयक प्रदीप ठाकूर आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# तळा पोलीस ठाणेच्या गणपतीला शांततेत भावपूर्ण निरोप

**दै.रायगड नगरी । तळा**

तळा पोलीस ठाणे येथील गणपतीला शांततेत भावपूर्ण निरोप देण्यात आला असून यावेळी गणपती बाप्पा मोरया पुढच्या वर्षी लवकर या असा जयजयकार करीत कोविड १९ च्या नियमांचे पालन करून शांततेत गणपतीचे विसर्जन करण्यात आले.



यावेळी तळा पोलीस ठाणेचे पोलीस निरीक्षक गोविंद ओमासे, पोलीस उपनिरीक्षक श्री शिवराज खराडे, पोलीस उपनिरीक्षक जवादे, पोलीस कर्मचारी विष्णुदास तिडके, गणेश जगताप, सरनेकर, पोटे, बांद्रे, सानप, बिरादार, शिंदे, आखाडे, नरवडे आदी पोलीस बांधव, चंद्रकांत रोडे, श्रीराम कजबजे, महेंद्रशेठ कजबजे, भरत तळकर, नागरिक व पत्रकार उपस्थित होते.

पोलीस बांधव वर्षभर जनता व सर्वांच्या रक्षणासाठी सातत्याने कर्तव्यावर असतात पोलिसांना कुठे कुठे कार्य करावे लागते पहा : सोनं चोरी पोलीस, गाडी चोरी पोलीस, पैसे चोरी पोलीस, मुलं–मुली अपहरण पोलीस, अपघात झाला पोलीस, आत्महत्या झाली पोलीस, आग लागली पोलीस, दिवाळी आली पोलीस, दसरा आला पोलीस, होळी आली पोलीस, होळी आली पोलीस थोर समाजसुधारक जयंती पोलीस, नेते येणार पोलीस, आमदार– खासदार येणार पोलीस, पी एम पासून तर सदस्यांपर्य बंदोबस्त पोलीस, बँक ड्युटी पोलीस, पुर आला पोलीस, परीक्षा ड्युटी पोलीस, भांडण झालं पोलीस, जंगली प्राण्याचा हल्ला झाला पोलीस, एखादा आरोपी फरार झाला पोलीस, खून झाला पोलीस, मोर्चा आला पोलीस, आंदोलन झालं पोलीस, जनावरांची तस्करी झाली पोलीस, कोणी पैसे घेऊन फरार झाला पोलीस, शनिवार– रविवार सर्वांना सुट्टी पोलीस ड्युटीवर, पत्ते खेळणारे पकडायचे पोलीस, जुगार चालू आहे पोलीस, सट्टा चालू आहे पोलीस, गुन्हा घडला तपास पोलीस, कोणी उपोषणाला बसले पोलीस, रस्ता माहित नाही माहिती विचारतो मात्र पोलिसांना, टपाल ड्युटी पोलीस, मतदान ड्युटी पोलीस, आरोपी ड्युटी पोलीस, निधन झाले पीएम करायचे पोलीस, अश्लील फोटोची माहिती पसरली पोलीस, बेवारस मृतदेह आढळला पोलीस असे विविध प्रकारचे कार्य करणाऱ्या पोलिसांना सत्य सलाम!

# ओबीसी समाजाला पुनश्च राजकीय आरक्षण मिळावे

## भारतीय जनता पक्षातर्फे मुरुड तहसीलदारांना निवेदन

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

ओबीसी समाजाला पुनश्च राजकीय आरक्षण मिळावे. यासाठी भारतीय जनता पक्षातर्फे मुरुड तालुका अध्यक्ष महेंद्र चौलकर यांनी आपल्या सहकाऱ्यांसमवेत तहसीलदार यांना एक निवेदन सादर करण्यात आले आहे. यावेळी सदर निवेदन नायब तहसीलदार रवींद्र सानप यांनी स्विकारले.

त्यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे कि, भा.ज.पा.सरकारच्या कालावधीत महाराष्ट्र राज्यात ओबीसी समाजाला राजकीय आरक्षण मिळाले होते.त्याचा सदुपयोग स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकींकरीता होत असे. ओबीसी समाजाला पुरेपूर फायदा होत असे. त्यामुळे मागास समाजाची वाटचाल सातत्याने सर्वांगीण विकास व प्रगतीकडे होती.

नंतर महाविकास आघाडी सरकारच्या नाकर्ते पणा मुळे ओबीसी समाजाचे आरक्षण रद्द झाल्याने



समाजाचा विश्वास घात झाला आहे. हा समाज मुलभूत सुविधांपासून व राजकीय निवडणुकांमधील आपल्या अधिकारांपासूंन वंचित राहीला.

महाविकास आघाडी सरकारने ओबीसी समाजाला पुनश्च राजकीय आरक्षण मिळवून द्यावे.अन्यथा यापुढे याविरोधात राजकीय आंदोलन अधिक तीव्र स्वरुपात होईल आणि याला राज्यातील महाविकास आघाडी सरकार जबाबदार असेल. असे भा.ज.पा.तर्फे देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले असून आमच्या व्यथा सरकार दरबारी कळविण्यात याव्यात.असे म्हटले आहे.

यावेळी भारतीय जनता पक्षाचे मुरुड तालुका अध्यक्ष महेंद्र चौलकर, उपाध्यक्ष विनोद भगत, सरचिटणीस नरेश वारगे,संघटन सरचिटणीस प्रवीण बैकर, शहर अध्यक्ष उमेश माळी, ज्ञानेश्वर डोलकर, नंदू मयेकर, जयेंद्र भणगे, महेश मानकर, अभिजित पानवलकर, पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# अनिल परबांनी किरीट सोमय्यांविरोधात हायकोर्टात दाखल केला १०० कोटींचा अब्रुनुकसानीचा दावा

**दै.रायगड नगरी । मुंबई**

भाजपचे माजी खासदार किरीट सोमय्यांविरोधात राज्याचे परिवहनमंत्री अनिल परब यांनी अखेर मुंबई उच्च न्यायालयात अब्रुनुकसानीचा दावा दाखल केला आहे. १०० कोटींचा अब्रुनुकसानीचा दावा परब यांनी सोमय्यांविरोधात दाखल केला आहे. याआधी परब यांनी अब्रुनुकसानीचा दावा ठोकणार असल्याचा इशारा यांनी सोमय्यांना दिला होता. ३ दिवसात माफी मागा नाहीतर १०० कोटींचा अब्रूनुकसानीचा दावा दाखल करेन, अशी नोटीस अनिल परब यांनी किरीट सोमय्यांना बजावली होती. सोमय्या जाहीरपणे आपली वारंवार बदनामी करत असल्याचं अनिल परब यांनी म्हटलं आहे.

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी सचिन वाझे याच्या माध्यमातून, माजी मृहमंत्री अनिल देशमुख यांनी संजीव पलांडे यांच्या, तर परिवहन मंत्री अनिल परब यांनी बजरंग खरमाटे या अधिकाऱ्याच्या माध्यमातून कोट्यावधी रुपयांची बेनामी संपत्ती गोळा केली आहे, असा आरोप भाजपचे नेते, माजी खासदार किरीट सोमय्या यांनी येथे केला. सोमवारी वंजारवाडी (ता. तासगाव) येथे पहिवहन अधिकारी बजरंग खरमाटे यांच्या फार्म हाऊसची पाहणी करण्यासाठी किरीट सोमय्या भाजपचे नेते मकरंद देशपाडे यांच्यासमवेत आले होते. सकाळी साडेदहा वाजता त्यांनी वंजारवाडीस



भेट दिली.परिवहन अधिकारी बजरंग खरमाटे यांना इडीने समन्स बजावून चौकशीसाठी बोलावले आहे. याबाबत सोमय्या म्हणाले, माझ्या माहितीप्रमाणे इडीच्या अधिकाऱ्यांकडे खरमाटे यांच्या ७५० कोटी रुपयांच्या बेनामी मालमत्तेची माहिती आहे. त्याचीच चौकशी सुरु झाली आहे. परिवहन मंत्री अनिल परब यांचेही काऊंटडाऊन सुरु झालेले आहे.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## राज्य सरकार सेवाभावी संस्थांना पाठबळ देत ग्रामीण भागातील विकासासाठी कटिबद्ध

आनंदच नव्हे तर अभिमानही वाटेल, असेही ते म्हणाले.

आमदार महेंद्र थोरवे यांनी खालापूर तालुका औद्योगिक क्षेत्र असल्याने अशा प्रकारच्या संस्थांनी ग्रामीण भागातील तरुणांना प्रशिक्षण देण्याचे काम सुरू केले असल्याने त्या तालुक्याचा रोजगाराचा प्रश्न मिटेल, आमदार म्हणून मी त्यासाठी सदैव पाठीशी राहीन,असे सांगितले. यावेळी ग्रामीण भागातील युवा व युवतींनी पहल संस्थेने जे प्रशिक्षण दिले त्याबद्दल मनोगत व्यक्त केले.

## सदनिका न देता केली दोन लाख १३ हजार रुपयांची फसवणूक, गुन्हा दाखल

नागरिकांनी सांगितले. बिल्डरच्या कार्यालयात जाऊन चौकशी केली असता रोहन यांच्या वडिलांना उडवाउडवीची उत्तरे देण्यात आली. त्यामुळे यशवंत झेंडे यांना फोन करून भरलेली रक्कम परत देण्यासाठी सांगितले. यावेळी यशवंत झेंडे यांनी ४० हजार रुपये परत दिले. आणि सदनिका न देता दोन लाख १३ हजार पाचशे रुपयांची फसवणूक करण्यात आली.

## सिडकोच्या एम्पॅनल्ड बँकाकडून आवश्यकतेनुसार मिळू शकणार कर्ज

सदर मुदतवाढीनंतर अनेक अर्जदारांच्या विनंतीनुसार सिडकोने आपल्या एम्पॅनल्ड बँकांशी संपर्क साधून अर्जदारांना अनामत रक्कम भरण्याकरिता आर्थिक सहाय्य करण्याबाबत व्यवस्था करण्यास सुचवले. यानंतर एम्पॅनल्ड बँकांनी संबंधित अर्जदारांना अनामत रकमेचा भरणा करण्याकरिता कर्ज देण्यास अनुकूलता दर्शविली. यानुसार एम्पॅनल्ड बँकांची यादी योजनेच्या https://lottery.cidcoindia.com या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

तथापि, अर्जदार व बँका यांमध्ये या संदर्भात करण्यात येणाऱ्या व्यवहारात सिडकोची कोणतीही भूमिका नसून अर्जदारांनी आपल्या जबाबदारीवर सदर बँकांशी व्यवहार करावा, असे सिडकोकडून कळविण्यात आले आहे.

## बनावट प्रमाणपत्राद्वारे नोकरी मिळविणाऱ्या युवकावर गुन्हा दाखल

त्यामुळे हा दाखला फेरकरून करून बनावट पद्धतीने तयार करण्यात आल्याचे निष्पन्न झाल्यानंतर चाणजे सजाचे तलाठी तेजस चोरगे यांना या बाबत उरण पोलिस ठाण्यात प्रितेश पाटील याच्यावर फेरफार करून बनावट क्रिमिलेअर दाखला दाखल करून नोकरी मिळविल्याबद्दल गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी उरण पोलिस अधिक तपास करत आहेत.

# इको फ्रेंडली बाप्पा- २०२१ स्पर्धेच्या विजेत्यांना व विशेष कामगिरी करणाऱ्यांना पुरस्कारांचे वितरण

**दै.रायगड नगरी । उरण**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर आपल्या लाडक्या बाप्पाचा सोहळा सामाजिक दृष्टीने आनंददायी व्हावा यासाठी 'आम्ही पिरकोनकर' समूहाच्या वतीने 'इको फ्रेंडली बाप्पा- २०२१' या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेअंतर्गत प्लास्टिक आणि थर्माकॉल विरहित सजावट, विघटनशील किंवा नैसर्गिक फुलांचा देखावा आणि कोविड सुरक्षितता यांसारख्या मुद्द्यांवर आधारित परीक्षण झाले.

'पर्यावरण पूरक' उत्सव ही संकल्पना समजून घेऊन त्याप्रमाणे सजावट करणे हे कौशल्याचे आणि मेहनतीचे काम होते. सहभागी झालेल्या सर्व स्पर्धकांनी प्रामाणिकपणे स्पर्धेचे निकष पूर्ण करण्याचा प्रयत्न केला. चांगला प्रतिसाद लाभलेल्या या स्पर्धेत कु. श्रीयश महेश घरत यांना प्रथम क्रमांक, कु. रोशन लक्ष्मण गावंड द्वितीय व संकेत पद्माकर गावंड यांनी तृतीय क्रमांक प्राप्त केला. या सर्व विजेत्यांना 'आम्ही पिरकोनकर' समूहाच्या वतीने गौरवण्यात आले.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

## संक्षिप्त...

## कामोठे येथील झाडे झुडपे साफ करून परिसर सुशोभित करण्याची मागणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कामोठे शहरातील सेक्टर ३५ आणि ३६ मधील सिडकोच्या राखीव प्लॉटवरील पावसाळ्यात वाढणारी दाट झाडी झुडपे साफ करून आसपासचा परिसर सुशोभित करण्याची मागणी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष संतोष जानू चिखलकर यांनी सिडकोकडे केली आहे.

कामोठे शहरातील सेक्टर ३५ आणि ३६ मध्ये सिडकोचे बरेचसे राखीव आणि रिकामे प्लॉट पडून आहेत. या सिडकोच्या रिकाम्या प्लॉटवरती पावसाळ्यामुळे खूप दाट अशी झाडे झुडपे वाढली असून घाणीचे साम्राज्य पसरले आहे. त्यामुळे येथे सरपटणार्या विषारी प्राण्यांचा सुळसुळाट सुरू झाला आहे.

हे विषारी प्राणी आजूबाजूच्या सोसायट्यांमध्ये प्रवेश करत असतात. त्यामुळे जीवितहानी होण्याची सध्या शक्यता आहे. तसेच तेथे साठलेल्या दूषित पाण्यामुळे डेंग्यू, मलेरिया किंवा कावीळ यासारख्या आजारांना आमंत्रण दिले जाते.

सिडकोच्या संबंधित विभागाने येथील सर्व रिकाम्या प्लॉटवर योग्य ती कार्यवाही करून साफसफाई करावी व परिसर स्वच्छ व सुशोभित करावा अशी मागणी संतोष चिखलकर यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

## ऑनलाइन गुरु पुष्पांजली भजन स्पर्धा २०२१ या स्पर्धेत रुपेश पाटील यांचा प्रथम क्रमांक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

ऑनलाइन गुरु पुष्पांजली भजन स्पर्धा २०२१ या स्पर्धेत रुपेश पाटील यांनी प्रथम क्रमांक पटकावला आहे.

आभार संस्था रत्नागिरी संचलित, रत्नागिरी जिल्हा प्रासादिक भजन मंडळ यांच्या सहयोगाने सागरी सीमा मंच कोकण प्रांत आयोजित भव्य कोकण विभागीय ऑनलाइन गुरुपुष्पांजली भजन स्पर्धा २०२१ या स्पर्धेत मुंबई उपनगर विभागातून नेरे येथील श्री ग्रामदेवता प्रासादिक भजन मंडळ यांच्यातर्फे रुपेश महादु पाटील याने प्रथम क्रमांक पटकावला आहे. या यशाबद्दल त्याचे अभिनंदन केले जात आहे.

# तळोजा जेलमधून आरोपीचे पलायन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

भांडुप येथील एका अल्पवयीन मुलाच्या हत्या प्रकरणात तळोजा जेलमध्ये कैदेत असलेल्या संजय यादव (२८) नामक आरोपीने जेलमधील गार्डची नजर चुकवून २५ फुट उंच असलेल्या जेलच्या सुरक्षा भिंतीवरुन उडी टाकून पलायन केल्याची घटना घडली आहे. या आरोपीचा पोलिसांनी सर्वत्र शोध घेतला. मात्र, तो अद्याप पोलिसांच्या हाती लागलेला नाही. त्यामुळे या आरोपीसह त्याच्यासोबत जेलमधून पळून जाताना पकडल्या गेलेल्या आरोपीविरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर घटनेत पळून गेलेला आरोपी भांडूप येथे राहण्यास असून २०१८ मध्ये भांडूपमध्ये झालेल्या एका १७ वर्षीय मुलाच्या हत्या प्रकरणात संजय यादव याला भांडूप पोलिसांनी अटक केली होती. त्यानंतर संजय यादव याची तळ-ोजा कारागृहात रवानगी करण्यात आली होती. आरोपी संजय यादव आणि राहुल जैस्वाल दोघेही औषध घेण्याच्या बहाण्याने आपल्या बॅरिकेटमधून बाहेर पडले होते. त्यानंतर दोघेही जेलमधील रुग्णालयाजवळ गेले असताना, तेथील वॉच टॉवरवर गार्ड नसल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यामुळे दोघेही वॉच टॉवरच्या जाळीचा दरवाजा उघडून वॉच टॉवरवर चढले. त्यानंतर संजय यादव याने सदर वॉच टॉवरला लागून असलेल्या तळोजा जेलच्या २५ फुट उंच भिंतीवर चढून तेथून त्याने बाहेर उडी टावून पलायन केले. यावेळी त्याच्यासोबत असलेला राहुल जैस्वाल भिंतीवरुन उडी टाकण्यास घाबरल्याने तो वॉच टॉवरवर थांबला. सदर प्रकार वॉच टॉवरवर तैनात असलेल्या गार्डच्या निदर्शनास आल्यानंतर त्याने तत्काळ राहुल जैस्वाल याला पकडले. तसेच पळून गेलेल्या संजय यादव याची माहिती जेल प्रशासनाला दिली. त्यानंतर जेल मधील सुरक्षारक्षकांनी भिंतीवरुन उडी टाकून पळून गेलेल्या संजय यादव याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. मात्र, तो त्यांना सापडला नाही. त्यानंतर पोलिसांनी संजय यादव राहत असलेल्या भांडूप येथील घरी जाऊन त्याचा शोध घेतला. मात्र, सदर ठिकाणी देखील तो सापडला नाही. त्यामुळे तळोजा जेल प्रशासनाच्या वतीने पळून गेलेला आरोपी संजय यादव आणि त्याच्यासोबत पळून जाण्याच्या प्रयत्नात असलेला राहुल जैस्वाल या दोघांविरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# नागोठणे पोलिस ठाण्यातील बाप्पांना भावपूर्ण निरोप



**दै.रायगड नगरी । वाकण**

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर शासकीय नियमांची काटेकोरपणे अंमलबजावणी करीत गणेशोत्सव काळात नागोठणे शहर व विभागात कोणताही अनुचित प्रकार घडु न देण्याची आपली जबाबदारी यशस्वीपणे पार पाडल्यानंतर नागोठणे पोलिस ठाण्यातील कर्मचार्यांनी आपल्या लाडक्या गणपती बाप्पांना भावपूर्ण निरोप दिला. नागोठण्यातील अंबा नदी किनारील विसर्जन घाटावर सोमवारी (दि. २०) सायंकाळी मोठ्या उत्साहाने व कोरोनाविषयक शासनाच्या नियमांचे पालन करीत संपन्न झालेल्या नागोठणे पोलिस ठाण्यातील बाप्पांच्या विसर्जन सोहळ्यास नागोठणे पोलिस ठाण्याचे पोलिस निरिक्षक तानाजी नारनवर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस कर्मचारी, त्यांचे कुटुंबिय, नागरिक व पत्रकार सहभागी झाले होते.

गणेशोत्सव काळात बंदोबस्तामुळे पोलिस कर्मचार्यांना रजा मिळत नसल्याने त्यांना आपल्या गावी जाता येत नाही. त्यामुळेच रायगड जिल्ह्यातील बहुतांश पोलिस ठाण्यात गणेशोत्सव साजरा करण्यात येत असतो. गणेशोत्सव काळातील आपले कर्तव्य बजावुन गणपती बाप्पांची सेवा ड्युटीवर असतानाच करण्याची संधी त्यानिमित्ताने पोलिस ठाण्यातच

पोलिस कर्मचार्यांना मिळत असते. त्यानुसारच नागोठणे पोलिस ठाण्यालगतच असलेल्या श्री दत् मंदिरात दरवर्षी प्रमाणे यावर्षीही गणपती बाप्पांची प्रतिष्ठापना करण्यात आली होती. अनंतचतुर्दशीच्या बाप्पांचे रविवारी (दि.१९) विसर्जन करण्यात आल्यामुळे मोकळे झालेल्या नागोठणे पोलिस ठाण्यातील कर्मचार्यांनी सोमवारी सायंकाळी साडेपाच वाजण्याच्या सुमारास आपल्या बाप्पांची विसर्जन मिरवणूक पारंपारिक पद्धतीने काढली. नागोठणे पोलिस ठाण्यापासून निघालेली पोलिस ठाण्यातील बाप्पांची ही मिरवणूक बाजारपेठ, शिवाजी चौक मार्गे अंबा नदीच्या विसर्जन घाटावर नेण्यात आली.

# शिवराय मित्र मंडळाचे अध्यक्षपदी महेंद्र भोसले यांची नियुक्ती



**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

रोहे तालुक्यातील गावदेवी मित्र मंडळ व उदय व्यायाम मित्र मंडळ संलग्न शिवराय मित्र मंडळ नडवली(ठाणे-मुंबई) या नावाजलेल्या मंडळाचे अध्यक्षपदी महेंद्र भोसले तर उपाध्यपदी विठोबा दळवी यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

गेल्या अनेक वर्षापासून सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, कला,क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रात कार्यरत असणार्या गावदेवी मित्र मंडळ व उदय व्यायाम मित्र मंडळ संलग्न शिवराय मित्र मंडळ नडवली(ठाणे-मुंबई) यांच्या वतीने नेहमीच सामाजिक बांधिलकी जपत विविधांगी कार्यक्रम संपन्न केले जात आहेत. तर शिवराय मित्र मंडळ ठाणे-मुंबई(नडवली) या मंडळाचे तसेच गावदेवी मित्र मंडळ व उदय व्यायाम मंडळ या तिन्ही मंडळाच्या सदस्यांची नुकतीच नडवली गावी संपन्न झालेल्या जाहीर सभेमध्ये सर्वानुमते महेंद्र भोसले यांची अध्यक्षपदी तर विठोबा दळवी यांची उपाध्यपदी नियुक्ती करण्यात आली आहे. यावेळी येथील उपसरपंच व युवा नेते मनोज शिर्के, मंडळाचे कार्यकर्ते किशोर जाधव,सुमित जाधव,अशोक शिर्के, अभिजित भोसले,अजय भोसले,भूषण वरखले,संदीप शिर्के,रमेश जाधव,सचिन जाधव, सचिन शिर्के, अजित लाडगे, नितीन मोहिते,लक्ष्मण लाडगे,हरेश जाधव आदी उपस्थित होते. महेंद्र भोसले यांची अध्यक्ष तर विठोबा दळवी यांची उपाध्यक्षटदी सर्वानुमते नियुक्ती करण्यात आल्यानंतर उपस्थिती आल्यानंतर उपस्थितीतांच्या वतीने दोघांचेही हार्दिक अभिनंदन व्यक्त करून शुभेच्छा देण्यात आल्या.


### जाहीर नोटीस

तमाम पंचक्रोशीतील जनतेला या नोटीसीने कळविण्यात येते की, खालील वर्णनाची मिळकत ही आमचे अशिलांनी जमिनीचे मालक यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे**

| गावाचे नाव | जमीन मालकांचे नांव | सर्व्हे नंबर | क्षेत्र (हेक्टर आर) | आकार |
|---|---|---|---|---|
| शेडुंग, ता.पनवेल, जि.रायगड | हरिश्चंद्र काशिनाथ भोईर व इतर | ४१/२ | ०.११.६० | ०.२२ |

या वरील मिळकतीचे मालकांशी आमचे अशिलांचा जमीन खरेदी करणेबाबतचा व्यवहार ठरलेला आहे. या मिळकतीशी कोणीही व्यक्ती, संस्था, बँक, सामाजिक संस्था यापैकी व इतर कोणाचाही कसलाही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांच्या आत त्याबाबत आम्हाला कळवावे. दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत नसल्यास कोणाचाही सदर मिळकतीत कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध नाही असे समजून आम्ही व आमचे अशिलावरील नमूद मालकांशी सदर मिळकतीसंदर्भात ठरलेला खरेदीचा व्यवहार पूर्ण करू. मुदतीनंतर कोणाचीही हरकत विचारात घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.

दि.२१/०९/२०२१
ठिकाण : पनवेल

सही/-
**ॲड.सतिश चं. काळे**
**३०६ गणेश टॉवर, मोठा खांदा**
**से.१७, पनवेल-४१०२०६**
**मो.नं.९८८१७८९८८८**

---

अर्जदाराचे वकील : ॲड.जितेंद्र परशुराम म्हात्रे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो.यांचे न्यायालयात
फौ.चौ.अर्ज क्र.९५५/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.२६/१०/२०२१

श्री.प्रदीप कमलाकर म्हात्रे — अर्जदार
विरुद्ध
ग्रामविकास अधिकारी
ग्रामपंचायत ओवळे
ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाले

जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार श्री.प्रदीप कमलाकर म्हात्रे यांची आजी मयत वनाबाई कृष्णा म्हात्रे ह्यांचा दि.०४/११/१९८८ रोजी गाव ओवळे, ता.पनवेल, जि.रायगड येथे राहत्या घरी मृत्यू झालेला आहे आणि अर्जदार यांनी आपल्या आजीच्या मृत्यूची नोंद होण्याकरिता पनवेल येथील मे.न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग यांचे न्यायालयात अर्ज केलेला आहे.

सदरहू श्री.प्रदीप कमलाकर म्हात्रे यांची आजी मयत वनाबाई कृष्णा म्हात्रे यांचा मृत्यू वर नमूद ठिकाणी झाला आहे किंवा कसे याबद्दल कोणास काही कळविण्याचे असेल व सदरहू अर्जास कोणाची हरकत असेल तर या जाहीर नोटीशीच्या दिनांकापासून १ (एक) महिन्याचे आत त्यांनी या न्यायालयात हजर राहून आपल्या कायदेशीर हरकती नोंदविण्याच्या आहेत. या लेखावरुन असे कळविण्यात येत आहे की, सदरहू मुदतीत योग्य हरकती न आल्या तर सदरहू न्यायालयात अर्जदार यांचेकडून योग्य तो पुरावा घेवून त्यास सदरहू व्यक्तीच्या मृत्यूची नोंद करण्याचे आदेश संबंधितांना देईल.

आज दि.२१/०९/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/- क.लिपीक फौ.न्याया, पनवेल** — (कोर्टाचा शिक्का) — **सही/- सहा.अधिक्षक फौ.न्याया, पनवेल**

---

अर्जदाराचे वकील : ॲड.जितेंद्र परशुराम म्हात्रे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो.यांचे न्यायालयात
फौ.चौ.अर्ज क्र.९५८/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.२६/१०/२०२१

श्री.चंद्रकांत जनार्दन मुंगाजी — अर्जदार
विरुद्ध
ग्रामविकास अधिकारी
ग्रामपंचायत ओवळे
ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाले

जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार श्री.चंद्रकांत जनार्दन मुंगाजी यांची आई मयत शोभा जनार्दन मुंगाजी ह्यांचा दि.२३/११/२००७ रोजी गाव ओवळे, ता.पनवेल, जि.रायगड येथे राहत्या घरी मृत्यू झालेला आहे आणि अर्जदार यांनी आपल्या आईच्या मृत्यूची नोंद होण्याकरिता पनवेल येथील मे.न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग यांचे न्यायालयात अर्ज केलेला आहे.

सदरहू श्री.चंद्रकांत जनार्दन मुंगाजी यांची आई मयत शोभा जनार्दन मुंगाजी यांचा मृत्यू वर नमूद ठिकाणी झाला आहे किंवा कसे याबद्दल कोणास काही कळविण्याचे असेल व सदरहू अर्जास कोणाची हरकत असेल तर या जाहीर नोटीशीच्या दिनांकापासून १ (एक) महिन्याचे आत त्यांनी या न्यायालयात हजर राहून आपल्या कायदेशीर हरकती नोंदविण्याच्या आहेत. या लेखावरुन असे कळविण्यात येत आहे की, सदरहू मुदतीत योग्य हरकती न आल्या तर सदरहू न्यायालयात अर्जदार यांचेकडून योग्य तो पुरावा घेवून त्यास सदरहू व्यक्तीच्या मृत्यूची नोंद करण्याचे आदेश संबंधितांना देईल.

आज दि.२०/०९/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/- क.लिपीक फौ.न्याया, पनवेल** — (कोर्टाचा शिक्का) — **सही/- सहा.अधिक्षक फौ.न्याया, पनवेल**

---

वारसाचं सर्टिफिकेटबद्दल जाहीर नोटीस

ॲड.मानस मोहंती व
ॲड.योगिनी भराडे, मोहंती
अर्जदार यांचे वकील

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे कोर्टात
चौ.अर्ज क्र.११८३/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२७/१०/२०२१

१) श्रीमती.शांती मुरुगेशन नायडू
वय : ५७ वर्षे, धंदा : गृहिणी
२) सुमती मुरुगेशन नायडू
वय : ३५ वर्षे, धंदा : गृहिणी
वरील १ ते २ रा.सी/२०३, वृंदावन पार्क,
प्लॉट क्र.९, सेक्टर ३६, कामोठे नवी मुंबई-४१०२०६
३) पद्मावती श्रीधर
वय : ३८ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.जी/३०१, ग्रँडीयर, प्लॉट क्र.३३/३४,
सेक्टर २०, कामोठे, नवी मुंबई-४१०२०६ — अर्जदार
विरुद्ध
निरंक — सामनेवाला

वरील अर्जदार १ यांचे पती व अर्जदार २ ते ३ यांचे वडील कै.मुरुगेशन नारायण स्वामी यांचे दि.०३/०१/२०२० रोजी तेरणा स्पेशालिटी हॉस्पिटल ॲण्ड रिसर्च सेंटर, सेक्टर २२, नेरुळ, नवी मुंबई येथे निधन झाले. यांच्या मालकीचे असलेले मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मालमत्तेचे वर्णन**
**५०% हक्क सी/२०३, वृंदावन पार्क, प्लॉट नं.०९, सेक्टर नं.३४, कामोठे, नवी मुंबई-४१०२०६, ता.पनवेल, जि.रायगड**
**क्षेत्रफळ ३८.३३ चौ.मी. बिल्टअप एरिया**

वरील मिळकतीबाबत अर्जदाराने वारस दाखला मिळणेबाबत अर्ज दिलेला आहे. तरी वरील वारसांचे दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क, अधिकार, हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात दाखल करावी. वरील पद्धतीने कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदारांच्या विनंती प्रमाणे वारस दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.२१/०९/२०२१ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** — (कोर्टाचा शिक्का) — **सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थी १) श्री.रोहिदास कृष्णा मढवी, २) श्री.रघुनाथ कृष्णा मढवी, ३) श्रीमती. कुसूम नामदेव मढवी, ४) श्री.समाधान नामदेव मढवी, ५) श्री.अनंता कृष्णा मढवी, ६) श्री.नितीन धनाजी मढवी, ७) श्री.सचिन धनाजी मढवी, ८) श्रीमती.निता विपीन मढवी, (श्रीमती.निता विपीन मढवी स्वतःकरिता त्यांच्या मुलांची अ.पा.क.आई म्हणून), ९) श्रीमती.कुदाबाई मधुकर मढवी, १०) श्री.मिलींद मधुकर मढवी आणि ११) श्री.समीर मधुकर मढवी सर्व रा.मु. पो.बेलोंडाखार, ता.उरण, जि.रायगड यांच्या मालकी वहिवाटीच्या मौजे : बेलोंडाखार, ता.उरण येथील खालीलप्रमाणे सविस्तर वर्णन केलेल्या जमीन मिळकती आहेत.

**जमीन मिळकतीचे वर्णन**
**मौजे : बेलोंडाखार, ता.उरण, जि.रायगड येथील**

| अ.क्र. | सर्व्हे / हिस्सा क्र. | क्षेत्र हे.आर.पॉ. | पोटखराबा हे.आर.पॉ. | एकूण क्षेत्र पोटखराब्यासह हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|---|
| १ | २०५ | ०-४९.७० | ०-०४.५० | ०-५४.२० | ४-२० |

वर नमूद केलेल्या मिळकती सदर मिळकतींमधील सर्व मालकी हक्कांसहीत सदर मिळकतींचे मालक श्री.रोहिदास कृष्णा मढवी, वगैरे ११, यांच्याकडून आमचे अशिल श्री.वासना लसू राम, राहणार : जालोर, राजस्थान यांनी कायम स्वरुपी खरेदीने घेण्याचे ठरविले आहे.

त्याअर्थी सदर मिळकतींमध्ये अगर त्यांचे कोणत्याही भागावर कुणाही तिर्‍हाईतांचे गहाण-दान, बक्षिस, फरोक्त, करारनामा, एम.ओ.यु., हुकूमनामा, मनाई आदेश, वहिवाट, हिस्सा अगर त्याप्रकारचे कोणतेही हक्क-हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर व्यवहारास कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधीत व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांचे आत आमच्या वरील प्रमाणेच्या पत्यावरील कार्यालयात सादर कराव्यात.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतींवरील श्री.रोहिदास कृष्णा मढवी, वगैरे ११, यांचे मालकी हक्क-हितसंबंध निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून आमचे अशिल सदर मिळकती खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत. हे सर्व जाहीर व्हावे.

पनवेल
दि.२२/०९/२०२१

सही/-
**श्री.विशाल अनंत मुंडकर, ॲडव्होकेट**
**शॉप क्र.२, पवन को.ऑप.हौसिंग सोसायटी,**
**कै.रत्नाकर खरे मार्ग, नवीन सेशन**
**कोर्टासमोर, पनवेल-४१०२०६, जि.रायगड**

---

राव साहेब

वकील : ॲड.सचिन अं. म्हात्रे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर सो.यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.१२४०/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.०८/११/२०२१

१) श्री.चंद्रकांत मनोहर सामंत
वय : ६७ वर्षे, व्यव : काही नाही
२) श्री.शंतनु चंद्रकांत सामंत
वय : ३५ वर्षे, व्यव : नोकरी
सर्व रा.४०३, बी विंग, ईडन गार्डन को.ऑप.हौ.
सोसायटी लि., प्लॉट नं.१७, सेक्टर नं.०८,
खांदा कॉलनी, नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

या जाहीर नोटीसीद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येत आहे की, कै. अलका चंद्रकांत सामंत यांचा मृत्यू दि.०८/०३/२०२१ रोजी रा.४०३, बी विंग, ईडन गार्डन को.ऑप.हौ.सोसायटी लि., प्लॉट नं.१७, सेक्टर नं.०८, खांदा कॉलनी, ता.पनवेल, जि.रायगड येथे झालेले असून त्यांचे खालील मिळकती बाबत वारस दाखला मिळणे करिता अर्जदार यांनी अर्ज केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**रुम नंबर ४०३, बी विंग, ईडन गार्डन को.ऑप.हौ., सोसायटी लि., प्लॉट नं.१७, सेक्टर नं.०८, खांदा कॉलनी, नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड**

वरील मिळकती ही कै.अलका चंद्रकांत सामंत, यांच्या नावे असून ते आज रोजी हयात नाहीत म्हणून अर्जदार हे त्यांचा वारसदाखला मिळण्यासाठी सदरचा दिवाणी चौकशी अर्ज दाखल करत आहेत.

वरील अर्जदार हे कै.अलका चंद्रकांत सामंत यांचे वारस नाहीत असे अगर अर्जदार यांस वारसदाखला देण्याबाबत अन्य कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी स्वतः अगर त्यांच्या वकीलामार्फत त्यांची हरकत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत आवश्यक त्या कागदोपत्री पुरावयासह ना.कोर्टात दाखल करावी. सदर मुदतीत हरकती न आल्यास कोणाची हरकत नाहीत असे गृहीत धरुन ना.कोर्ट अर्जदार यांस वारसदाखला प्रदान करील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.२०/०९/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/- क.लिपीक दि.न्या.क.स्तर, पनवेल** — (कोर्टाचा शिक्का) — **सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.क.स्तर, पनवेल**

---

मे.मुजावर साहेब

अर्जदाराचे वकील
ॲड.जान्हवी वाडकर-गोगटे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.६०१/२०२१
नि.नं.८
ने.ता.२७/१०/२०२१

१) श्रीमती.वीणा रवींद्र खरे
वय : ५३ वर्षे, धंदा : गृहिणी
२) गायत्री रवींद्र खरे लग्नानंतरचे नाव :-
सौ.गायत्री सचिन रानडे
वय : २७ वर्षे, धंदा : शिक्षक
३) कु.जान्हवी रवींद्र खरे
वय : २२ वर्षे, धंदा : शिक्षण
अ.क्र.१ ते ३ रा.बी-५, मंगलमुर्ती को.ऑप.हौसिंग
सोसायटी, जुना ठाणा नाका रोड, नवीन प्रांत ऑफिस
जवळ, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कै. रवींद्र यशवंत खरे हे दि.१७/१२/२०२० रोजी मयत झाल्याने अर्जदार यांनी कै.रवींद्र यशवंत खरे यांचे वारसपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**अ) महिंद्रा कंपनीची KUV 100 ही चारचाकी जिचा क्र. MH 46 BE 0332 हा असून चेसीस नं. MA1VB2NACH6C85058 व इंजिन नं. NAHZC54614 असे आहेत.**
**ब) होंडा कंपनीची शाईन ही दुचाकी जिचा क्र. MH 06 AM 632 हा असून चेसीस नं. ME4JC364C78028392 व इंजिन नं. JC36E9041858 असे आहेत.**

अर्जदार हे कै.रवींद्र यशवंत खरे यांचे कायदेशीर वारसदार आहेत. त्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकत घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत, जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर मे.कोर्ट अर्जदार यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर कै.रवींद्र यशवंत खरे यांच्या वारस-पत्रास हक्कदार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.२०/०९/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** — (कोर्टाचा शिक्का) — **सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

गोडसे मॅडम सो

अर्जदाराचे वकील
ॲड.जान्हवी वाडकर-गोगटे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१२१०/२०२१
ने.ता.२७/१०/२०२१

१) श्री.परेश सुभाष पारकर
वय : ३३ वर्षे, धंदा : नोकरी
रा.अ/४०२, हरिओम रेसिडेन्सी,
स्वामी नित्यानंद मार्ग, सिनिअर सिटीजन
हॉलसमोर, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड
२) श्री.स्वाती सुभाष पारकर
लग्नानंतरचे नाव : स्वाती दत्ताराम पेणकलकर
वय : ३८ वर्षे, धंदा : घरकाम
रा.अ/४०२, हरिओम रेसिडेन्सी,
स्वामी नित्यानंद मार्ग, सिनिअर सिटीजन
हॉलसमोर, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कै. सुभाष गजानन पारकर हे दि.३/१०/२०१९ रोजी मयत झाले. तसेच कै. सुनंदा सुभाष पारकर ही दि.१९/१०/२०१४ रोजी मयत झाली आहे. अर्जदार यांनी कै.सुभाष गजानन पारकर व सुनंदा सुभाष पारकर यांचे वारसपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**फ्लॅट क्र.४०२, हरिओम रेसिडेन्सी, को.ऑप.हौ.सोसायटी, फायनल प्लॉट क्र.२६, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड (क्षेत्र ३५० चौ.फूट कारपेट)**

अर्जदार हे कै.सुभाष गजानन पारकर व कै.सुनंदा सुभाष पारकर यांचे कायदेशीर वारसदार आहेत. त्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकत घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत, जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.कोर्ट अर्जदार यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर कै.सुभाष गजानन पारकर व कै.सुनंदा सुभाष पारकर यांच्या वारसपत्रास हक्कदार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.२०/०९/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** — (कोर्टाचा शिक्का) — **सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# महागाईने कंबरडे मोडले ; उज्वला योजनेचे तीन तेरा, गॅस दरवाढीने 'उज्वला'च्या डोळ्यात धूर

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

महागाईने सर्वसामान्य गोरगरीब जनतेचे कंबरडे मोडले आहे. कोरोनाच्या महामारीत एकवेळच्या जेवणाची पंचाईत तिथं हजार रुपयाला स्पर्श करणारे गॅस सिलेंडरचे दर सर्वसामान्यांना परवडणारे नाहीत. सरकारी योजना गरिबांच्या मुळावर उठल्या आहेत. दिवसेंदिवस होणाऱ्या गॅस दरवाढीमुळे केंद्र सरकारच्या महत्त्वाकांक्षी योजना उज्ज्वलाच्या लाभार्थ्यांच्या डोळ्यात धूर व हाती फुकणी आली आहे.

ग्रामीण व शहरी भागात देखील आता चुली पेटल्या आहेत. उज्वला योजनेचे तीनतेरा वाजलेत, या योजनेतील लाभार्थ्यांना ९ ०० रुपये भरुन सिलेंडर आणणे आवाक्याबाहेर गेले आहे. ग्रामीण भागातील अनेकांनी तर पुन्हा चुलीवर जेवण बनविण्यास प्राधान्य दिल्याचे दिसत आहे. त्यामुळे केंद्राचे चूल आणि धूरमुक्तीचे स्वप्न प्रत्यक्षात साकार होणार का ? असा सवाल उपस्थित होतोय. केंद्र शासनाने चुलीवर जेवण बनविणाऱ्या गोरगरीब महिलांना चुलीच्या पुरापासून व फाट्यापासून मुक्ती देण्याकरता महत्त्वाकांक्षी योजना उज्वला योजना २०१६ मध्ये लागू केली. या योजनेअंतर्गत केंद्र सरकारने गोरगरिबांना मोफत गॅस कनेक्शन दिले. त्यामुळे सकाळ - संध्याकाळ चुलीच्या धुराचा सामना करणाऱ्या गरीब परिवारातील महिलांना थोडा आधार मिळाला खरा पण त्यांचा हा आनंद जास्त काळ टिकू शकला नाही . कारण गैस सिलेंडरच्या किंमतीत सातत्याने दरवाढ होत असल्याने सरकारच्या उज्ज्वला योजनेला हरताळ फासला गेला आहे . बेणसे सिद्धार्थ नगर येथील छायाबाई सावंत म्हणाल्या गॅस चे भाव वाढल्याने घर चालवावे कसे हा प्रश्न पडला, ग्रामीण भागातील महिलांना लाकूड फाटा जमा करायला रानावनात भटकावे लागतेय. धुराचा त्रास होतो, जिव मेटाकुटीला येतोय, चुलीवर जेवण बनवणे कठीण जातेय, सर्वच वस्तूंची महागाई वाढले, जगावे की मरावे अशी परिस्थिती आहे असे सावंत म्हणाल्या. पावसाळ्यात रानात जाणे शक्य नाही, तर ओली लाकडे पेटत नाहीत. प्लास्टिक वर बंदी आहे तर रेशनवर घासलेट मिळत नाही, चहूबाजुनी आमची कोंडी सरकारने केलीय असा संताप राबगाव येथील महिलांनी व्यक्त केला. सुधागड तालुक्यात देखील भयावह परिस्थिती आहे, सिलेंडर गॅस चे भाव वाढल्याने घरोघरी चुली पेटल्या आहेत. महिलांनी आता त्रास सहन करून चुलीवर जेवण बनवायला सुरवात केलीय. मात्र वृद्ध महिलांची चुलीवर जेवण बनविण्याच्या प्रक्रियेत मोठी दमछाक होतेय. गॅस आणायचा म्हणजे १००० रुपये लागतात, आमची परिस्थिती हलाखीची अशात पैसे आणायचे कुठून?म्हातारपण यामुळे लाकड आणता येत नाहीत, काम होत नाही, खुप अडचणी आहेत, सरकारने गरिबाला जगवावे ही विनंती. असे बेणसे सिद्धार्थनगर येथील चंद्रभागा अडसुळे यांनी सांगितले. राबगाव येथील सरिता वातेरे यांनी सांगितले की कोरोनाच्या महामारीत पैसे आणणार कुठून, महागाईने बेजार झालोय, चूल पेटवायची तर लाकड आणावी लागतात, जंगलात जावे लागते, पावसात जाणे शक्य नाही, रॉकेल देखील मिळत नाही, चूल पेटवावी तरी कशी हा विचार पडतो.

लाकूड फाटा मिळत नाही त्यामुळे मोठं आव्हान उभे ठाकलेय. महाग गॅस सिलेंडर विकत घेण्याची ऐपत नसलेल्या गोरगरीब परिवारातील महिलांना लाकूड वा कोळशाच्या चुलीवर स्वयंपाक करून धुराचा सामना करावा लागत आहे. कोरोना महामारीत रोजगार बुडाला, जगण्याचे मोठे आव्हान उभे ठाकले, त्यात महागाईने जिव व्याकुळ झाल्याचे मत महिलांनी मांडले.



## ७५ टक्के उज्ज्वलानी फिरवली पाठ

१६ ऑगस्ट २०२१ व १ सप्टेंबर २०२१ या १५ दिवसांच्या कालावधीत घरगुती गॅस सिलेंडरमध्ये २ वेळा १६ ऑगस्टला २५ व १ सप्टेंबर २०२१ ला २५ रुपयांची वाढ झाली . म्हणजे पंधरा दिवसात ५० रुपयांची वाढ होऊन सदरचा सिलेंडर ८८ ९ रुपये ५० पैसे म्हणजे सुमारे ९ ०० रुपयांच्या घरात गेला. त्यामुळे ज्या गोरगरीबांना सिलेंडरचे डिपॉझिट भरणे शक्य नव्हते अशा गोरगरिबांना उज्ज्वला योजना म्हणून केंद्र शासनाने गॅस उपलब्ध करून दिला होता. परंतु गॅसच्या दिवसेंदिवस अफाट वाढलेल्या किंमतीमुळे उचला योजनेअंतर्गत घेतलेल्या सिलेंडरचे रिफील करणे कठीण झाल्याने पेण तालुक्यातील सुमारे ७५ टक्के उज्ज्वला गॅसधारकांनी महागडया सिलेंडरकडे पाठ फिरवली आहे. पेण तालुक्यात सुमारे ४००० ते ५५०० उज्चला गॅस योजनेचे लाभार्थी असून त्यापैकी केवळ २५ टोच लाभार्थी महागड्या गॅसचा वापर करीत आहेत. देशभरात उज्वला गॅस योजनेअंतर्गत सुमारे ८ कोटी गोरगरिबांना सिलेंडर उपलब्ध करुन देण्यात आले होते. यापैकी सुमारे २५ ते ३० टक्के सिलेंडरच पुन्हा रिफिल होत आहेत.

## सामान्यांचेही कंबरडे मोडले

भारत पेट्रोलियम, हिंदुस्तान पेट्रोलियम व इंडियन ऑइल कॉर्पोरेशन या कंपन्यांच्या मार्फत घरगुती गॅस सिलेंडरचा पुरवठा करण्यात येतो. पेण तालुक्यात सुमारे ५० हजार गॅस सिलेंडरधारक आहेत. एका गॅस कनेक्शनला एका महिन्याला १ सिलेंडर यानुसार बारा महिन्यांना १२ सिलेंडर घेता येतात. परंतु गॅस दरवाढीमुळे १२ च्या ऐवजी सरासरी सुमारे ७ ते ८ सिलेंडरच सर्वसामान्य गॅस कनेक्शनधारक घेत असल्याची माहिती वरदान गॅस एजन्सीचे मालक उदय मनोरे यांनी दिली. थोडक्यात गॅस सिलेंडरचे भाव वाढल्याने सर्वसामान्यांचे कंबरडे मोडले आहे.

## अनुदान मिळालेच नाही

पूर्वी गॅस सिलेंडर अनुदानित रकम वजा करून उर्वरित रक्कमेमध्येच मिळत होते. त्यामुळे गॅस सिलेंडरचे भाव कमी होते. त्यानंतर केंद्र शासनाने घोरण बदलून गॅस ग्राहकांकडून पूर्ण रकम घेऊन अनुदानाची रकम खात्यात जमा करण्याची पद्धत सुरू केली. तरीही गॅसग्राहकांना खात्यात का होईना पण अनुदान मिळत होते . परंतु १ एप्रिल २०२० पासून अनुदानाची रक्कम कोणत्याही ग्राहकांना मिळालीच नाही.

## तरीही उज्वला २ योजनेचा घाट

उज्वला योजनेअंतर्गत दिलेल्या गॅसधारकांनी गॅस सिलेंडरकडे पाठ फिरवली असताना देखील केंद्र शासनाने मात्र उज्वला २ योजनेचा घाट घातला आहे. या योजनेअंतर्गत पुन्हा एकदा गोरगरिबांना मोफत गॅस कनेक्शन देण्यात येणार आहे . परंतु त्यानंतरच्या गॅस सिलेंडर रिफिल करताना मात्र गॅसच्या महागड्या किंमतीमुळे गोरगरिबांचे कंबरडे मोडणार हे मात्र निश्चित. राज्यातील अनेक गरीब उज्वलांवर चुल फुकण्याची वेळ आणली आहे. सिलेंडरच्या वाढलेल्या किंमतीमुळे गोरगरीब महिलांना फुकणी हातात धरून अश्रू गाळण्याची वेळ आली आहे.

# संक्षिप्त...

## वाहनाच्या धडकेत ५१ वर्षीय इसमाचा मृत्यू

**दै.रायगड नगरी । पनवेल**

अज्ञात वाहनाच्या धडकेत आसुडगाव, खांदा कॉलनी येथील ५१ वर्षे राजाराम शंकर आवटी यांचे निधन झाले आहे. खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

राजाराम शंकर आवटी हे जेवणानंतर शतपावली करण्याकरता राहत्या बिल्डिंगच्या बाहेर गेले. यावेळी अज्ञात वाहनाने त्याला धडक दिली. या धडकेत त्यांचा मृत्यू झाला आहे.

## ४५ वर्षीय महिला बेपत्ता

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तळोजा एमआयडीसी येथून पेण-रावे येथे येण्यासाठी निघालेली महिला घरी न परतल्याने ती हरवली असल्याची तक्रार तळोजा पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.

प्रभावती गजानन पाटील ही महिला फोर स्टार मच्छी कंपनी तळोजा एमआयडीसी येथून राहते घरी रावे-पेण येथे येण्यासाठी निघाली.

मात्र ती घरी परत आली नाही. त्यामुळे ती हरवली असल्याची तक्रार तळोजा पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.

या महिलेचा रंग गोरा, उंची पाच फूट, बांधा मध्यम व गळ्यात काळया मण्यांचे मंगळसूत्र आहे. तिने अंगात रंगीबेरंगी साडी, आकाशी रंगाचा ब्लाउज घातला आहे. या महिलेबाबत अधिक माहिती असल्यास त्यांनी पोलिस नाईक अर्जुन पवार यांच्याशी संपर्क साधावा.


### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


# बेडरूमच्या भिंतीला तडे गेल्याने केली शिवीगाळ व मारहाण

**दै.रायगड नगरी । पनवेल**

बेडरूमच्या भिंतीला तडे गेल्याचा राग मनात धरून मारहाण आणि शिवीगाळ केल्याचा धक्कादायक प्रकार कामोठे परिसरात घडला आहे. आरोपींविरोधात कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

इंडियन नेव्ही मधून रिटायर्ड झालेले सुभाषचंद्र भरत पात्र (वय ६९ )हे कामोठे, सेक्टर ५ येथे राहतात. १७ सप्टेंबर रोजी त्यांच्या घराच्या हॉलचे प्लास्टर करण्यासाठी मेस्त्री आणि सोबत काम करण्यासाठी इसम आले होते. पियूपी काढत असताना बाजूच्या रूमच्या बेडरुमच्या भिंतीचे प्लास्टरला तडे गेले. यावेळी राज किशोर शर्मा, त्यांच्यासोबत त्यांची पत्नी, मुलगा व त्यांच्या घरात राहणारा एक मुलगा असे चौघेजण सुभाषचंद्र यांच्या घरी आले व बेडरूमच्या भिंतीला तडे गेले असे बोलून आरडाओरडा करू लागले. यावेळी तडे गेले असतील तर ते काम करून देतो असे सांगितले असता राजकिशोर यांच्या मुलाने सुभाषचंद्र यांचा गळा दाबला. व त्यांच्या पत्नी, राजकिशोर आणि एका मुलाने त्यांना धक्का दिला. त्यामुळे ते गॅलरीत पडले. चौघांनीही सुभाषचंद्र यांना शिवीगाळ करून हातापायांने मारहाण केली. त्यांना हॉस्पिटलमध्ये दाखल केले असता कमरेच्या मणक्याला फ्रॅक्चर असल्याचे सांगितले आहे. चौघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



ढगफुटी सदृश अतिवृष्टीने साळाव-मुरुड रस्त्यावर विहूर पुलाची पार दुरावस्था झालेली असून भराव वाहून गेले आहेत तर मोठ्या प्रमाणावर पडलेल्या खड्ड्यांमुळे वाहनचालकांना कसरत करावी लागत आहे. (छाया : राजीव नेवासेकर)

# ग्रामीण भागातील लघुउद्योग व महिला बचतगटांसाठी आठवडी बाजार संकल्पना उपयुक्त

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

कोरोना सारख्या जागतिक महामारीमुळे अनेक छोटे-मोठे उद्योगधंदे बंद पडले. लोकांचे रोजगार गेले. अशा परिस्थितीत महिला आठवडी बाजाराची सुरुवात केल्यास तालुक्यातील रोजगार निर्मितीला चालना देऊन देशासमोर एक नवीन आदर्श निर्माण करता येईल, लघु आणि कुटीर उद्योगांना प्रोत्साहन देता येईल व खऱ्या अर्थाने महिला सबलीकरणाचा उद्देश सफल होईल, या उद्देशाने अनोख्या आठवडी बाजाराची संकल्पना मांडण्यासाठी कर्जत नगरपालिकेच्या नगराध्यक्ष सुवर्णाताई जोशी यांची नुकतीच कर्जत येथे भेट घेण्यात आली.

याप्रसंगी मदर आय फाउंडेशन कर्जतचे आशिष लाड, धनंजय मोरे, दिनेश बडेकर, तसेच महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाचे जिल्हा व्यवस्थापक सिद्धेश राऊळ व चंद्रशेखर पाटील, कर्जत तालुका अभियान व्यवस्थापक ललिता तेलवणे, तालुका व्यवस्थापक राजू नेमाडे व सद्भावना फाउंडेशन कर्जतच्या सुनंदा लाड आदी मान्यवर उपस्थित होते.

समाजव्यवस्थेतील मध्यमवर्गीय कुटुंबातील दुर्बल घटकांना आशेचा किरण म्हणून स्वयंसहाय्यता बचतगटाकडे पाहिले जाते. देशातील कोट्यवधी महिलांच्या आर्थिकच नाही तर समग्र भवितव्याला आकार देण्याचे काम बचतगटाच्या माध्यमातून अविरत सुरू आहे. बचतगट म्हणजे महिला सक्षमीकरणाची उज्वल दिशा आहे. बचतगटाच्या माध्यमातून अनेक महिलांना संघटित करून त्यांचे जीवनमान उंचाविले जात आहे. त्यांच्या प्रयत्नांना यश मिळवून देण्यासाठी ही संकल्पना मोलाची ठरेल असे सिद्धेश राऊळ यांनी स्पष्ट केले. याप्रसंगी कर्जत तालुक्यातील स्थानिक बचतगटातील महिला, शेतकरी महिला, आदिवासी व ग्रामीण महिला यांच्या स्थानिक व्यवसायांना प्रोत्साहन देऊन महिलांचा सामाजिक आणि आर्थिक स्तर उंचावणे, स्थानिक लघु आणि कुटीर उद्योगांना प्रोत्साहन देणे,नगरपरिषद हद्दीत एक हक्काची बाजारपेठ निर्माण करून आदर्श निर्माण करणे, ही व अशा प्रकारची अनेक उद्दिष्टे साध्य करता येऊ शकतील, असे मत मदर आय फाऊंडेशनचे आशिष लाड यांनी व्यक्त केले. कर्जत नगरपरिषद हे तालुक्याचे ठिकाण असल्यामुळे हद्दीमध्ये सध्या ग्रामीण भागातून मोठ्या प्रमाणात स्थलांतर होत असून तालुक्याची उपलब्ध बाजारपेठही मर्यादित व छोटी असल्याने तालुक्याची एकाच ठिकाणावर खरेदी होते. आठवडी बाजाराच्या माध्यमातून विविध गृहोपयोगी वस्तू व खाद्यपदार्थ ग्राहकांसाठी उपलब्ध केले जाऊ शकतात.

# निवृत्त मुख्याध्यापिका अनुराधा म्हात्रे यांचे दु:खद निधन

**दै.रायगड नगरी । उरण**



उरण तालुक्यातील चिरनेर ग्रामपंचायतीचे माजी सरपंच अविनाश म्हात्रे व ज्येष्ठ पत्रकार सूर्यकांत म्हात्रे यांच्या मातोश्री निवृत्त मुख्याध्यापिका स्व.अनुराधा राजाराम म्हात्रे(८१) यांचे काल संध्याकाळी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले.त्यांच्या अचानकपणे जाण्याने त्यांच्या म्हात्रे कुटुंबियांवर मोठ्या प्रमाणात शोककळा पसरली आहे. अनुराधा म्हात्रे या रायगड जिल्हा परिषदेतील उरण,पनवेल तालुक्यासह माणगाव व पोलादपुर तालुक्यातील अतिशय दुर्गम भागातील खेड्यातील प्रार्थमिक शाळेत शिक्षिका म्हणून काम करित असतांना त्यांनी अनेक विद्यार्थी घडविले आहेत. त्यांच्या मागे त्यांचे पती निवृत्त मुख्याध्यापक राजाराम म्हात्रे,तीन मुलगे,सुना आणि नातवंडे असा त्यांचा मोठा परिवार आहे.त्यांचा दशक्रिया विधी श्री क्षेत्र चिरनेर खाडी येथे बुधवार दि. २९ सप्टेंबर रोजी होणार असून उत्तरकार्य चिरनेर येथिल राहत्या घरी १ ऑक्टोबर २०२१ रोजी होणार असल्याचे त्यांचे चिरंजीव प्रशांत म्हात्रे यांनी सांगितले.

# कोरोना महामारीनंतर पेन किलर गोळ्यांच्या वापरात वाढ

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कोरोना महामारीनंतर पेन किलर गोळ्यांचा वापर वाढला असून ते आरोग्यासाठी धोकादायक आहे. अनेक आजारांमध्ये अंग मोडून येऊ शकते. आपल्या शरीराला काही त्रास झाला तर पेन किलर गोळी घेण्याचे आपल्यावर जणू संस्कारच झाले आहे. परंतु पेनकिलर गोळ्यांचे अतिसेवन हे आरोग्यासाठी त्रासदायक आहे.

अमेरिकन क्रोनिक पेन असोसिएशनद्वारा संपूर्ण जगभर सप्टेंबर हा महिना हा वेदना जागरूकता महिना म्हणून साजरा केला जातो. याविषयी अधिक माहिती देताना स्टारसिटी मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलचे संचालक व ज्येष्ठ फिजिशियनव व छातिरोग तज्ञ डॉ. प्रवीण भुजबळ म्ह्णाले, अंग दुखणं म्हणजेच आपल्या शरीराला सतत त्रास होत राहणे होय. छातीत दुखणे, गुडघे व सांधे दुखणे, तसेच जे नागरिक उदरनिर्वाहासाठी अंगमेहनतीची कामे करतात ते अंगदुखीनी बेजार असतात. आजमितीला वयाच्या तिशीतल्यातरुण पिढीला सुद्धा शारीरीक दुखणी सुरू झाले आहेत. आपल्याकडे अंगदुखी व पेनकिलर ही नवरा बायकोची जोडी झाली आहे. अनेक नागरिक वर्षानुवर्षे अंगदुखीसाठी पेन किलरचा वापर करीत असतात. प्रामुख्याने संसर्गजन्य ताप, मलेरिया, टायफॉइड, डेंग्यू, अशा आजारांमध्ये तापासोबत अंग दुखते. काहीवेळा शरीरातील डी जीवनसत्व कमी असल्याने सांधेदुखी होते. दात दुखणे, हातापायात वेदना होणे, डोकेदुखी अशा सर्वसाधारण आजारांमध्ये अनेकजण मेडिकल दुकानात जाऊन पेन किलर घेतात त्यामुळे त्यांना तात्पुरता आराम मिळतो. परंतु त्या आजाराची कारणे शोधली पाहिजेत. करोनाच्या पहिल्या लाटेत जी औषधे वापरली गेली त्या औषधांचा वापर दुसऱ्या लाटेत कमी झाला परंतु आजही अनेक पहिल्या लाटेचीच प्रिस्क्रिप्शन वापरले जाते. आजकाल सोशल मिडीयाच्या माध्यमातून प्रिस्क्रिप्शन शेयर केली जातात व ते धोकादायक आहे. अनेकवेळा हृदयविकार, ब्रेन स्ट्रोक या आजाराची सौम्य लक्षणे दिसल्यावर अनेकजण पेनकिलर म्हणजे वेदनाशामक गोळ्यांच्या मारा करतात. त्यामुळे पुढील काही दिवस ती लक्षणे दिसत नाहीत व रुग्णाला खात्री वाटते की आपला आजार बरा झाला आहे परंतु तोच आजार थोड्याच दिवसांनी परत उफाळून येतो व त्यावेळी त्याचे निदान करणे कठीण जाते. पेनकिलरच्या अतीसेवनामुळे किडनी व हृदयाला सर्वाधिक धोका निर्माण होऊ शकतो.

# तळे प्रा. आ. केंद्राला दोन वैद्यकीय अधिकारी नियुक्त

**दै.रायगड नगरी । तळा**

तळे हा दुर्गम व डोंगरी तालुका. या तालुक्यात तालुका निर्मिती पासून एकच प्राथमिक आरोग्य केंद्र व पाच उपकेंद्रे होती. गेली काही वर्षे या प्राथमिक आरोग्य केंद्रात व उपकेंद्रात आरोग्य कर्मचारी पदे रिक्त होती. याच दरम्यान कोविड सारख्या मारामारीने संपूर्ण आरोग्य यंत्रणेवर ताण पडू लागला. कमी कर्मचारी वर्गांमध्ये रात्रं दिवस आरोग्य कर्मचारी काम करून रूग्णांना आरोग्य सेवा देत होते. त्यातच तळें प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. अमोल बिरवाडकर यांची बदली झाली. दरम्यान या ठिकाणी M.B.B.S. असे वैद्यकीय अधिकारी असे कोणीच नव्हते.

पालकमंत्री ना. आदिती तटकरे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मा. किरण पाटील, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. मोरे यांचे प्रयत्नातून तळे प्रा. आ. केंद्र येथे डॉ. गजेंद्र मोघे (किनवाट) MBBB व डॉ. संदिप सांगाडे MBBS (पनवेल) येथुन दिनांक २० सप्टेंबर रोजी नियुक्त झाले आहेत. तळे प्रा. आ. केंद्राला दोन MBBS डॉक्टर लाभले मुळे या तालुक्यातील आरोग्य सेवेला बळकटी प्राप्त होणार असून रुग्णांना उत्तम प्रकारे आरोग्य सेवा मिळेल. अशी आशा वाटते. दोन वैद्यकीय अधिकारी हजार झाल्या मुळे नागरिकांमध्ये समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

तालुक्यात नव्याने निर्माण झालेले महागाव आणि मांदाड या दोन प्राथमिक आरोग्य केंद्रामुळे त्या परिसरातील रुग्णांना उत्तम आरोग्य सेवा मिळेलच. ग्रामीण विभाग व दुर्गम परिसर असल्यामुळे पालकमंत्री ना. आदिती तटकरे यांनी ही दोन प्राथमिक आरोग्य केंद्रे सुरू करण्यासाठी युद्ध पातळीवर प्रयत्न केले आहेत.

नजीकच्या काळात तळा येथे ग्रामीण रुग्णालय ही सुरू होईल त्यामुळे कर्मचारी वर्ग व्यवस्थित लाभल्यास तळे तालुक्याची आरोप सेवा सुस्थितीत चालेल याची खात्री वाटते. रुग्णांना येथे आरोग्य सेवा व्यवस्थित मिळेल. या दोन्ही वैद्यकीय अधिकारी वर्गाकडून आशा आहे. त्या दृष्टीने ते प्रयत्नशील राहतील.